# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email cccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


जा.क्र.कक्ष-१/पाणथळ समिती/१८८/सन २०२४ - २५ दिनांक:-१८/०१/२०२५

प्रति,

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
४. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
५. मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे(ग्रामीण)/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
६. मा.संचालक, पर्यावरण विभाग, MCZMA
७. मा. आयुक्त / सह आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई/पनवेल/भिवंडी-निझामपुर, उल्हासनगर)
निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. मा.अपर आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण विभाग
९. मा.उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१०. प्रादेशिक आधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
११. नगर रचना विभागाचे अधिकारी / शहर आणि औद्यौगिक विकास महामंडळ (सिडको)
१२. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
१३. डॉ.महेश शिंदीकर, Applied dept.of Science, College of Engineering Pune, Wellesy Road, Shivaji Nagar, Pune.

**विषय :- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५१ व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे जा.क्र.कक्ष-१/पाणथळ समिती/१६३/सन २०२४-२५, दिनांक १७.१२.२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भान्वये कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची **५१ वी** बैठक **गुरुवार, दि.२६.१२.२०२४** रोजी **मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

(डॉ. शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५१ वी बैठक
## दिनांक २६.१२.२०२४ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची मा. विभागीय आयुक्त यांचे दालनात, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथे ५१ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीशः अथवा व्हि.सी.व्दारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजेश देशमुख, भा.प्र.से. | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ४. | श्री. नितिन महाजन | अपर आयुक्त, महसूल | विभागीय आयुक्त, कोकण यांचे कार्यालय |
| ५. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| ६. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| ७. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग |
| ८. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| ९. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १०. | श्री.अभय पिंपळकर | संचालक (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ११. | श्री.प्रदीप रा.तावरे | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे प्रतिनिधी (सहा.अधीक्षक) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| १२. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी | मुंबई कांदळवन संधारण घटक,दक्षिण कोकण |
| १३. | सौ.गिरिजा देसाई | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.व्दारे) | चिपळूण |
| १४. | श्री.सुधीर लक्ष्मण मांजरे | वनपरिक्षेत्र अधिकारी | नवी मुंबई |
| १५. | श्री.स्टॅलिन डी | संचालक (व्ही.सी.व्दारे) | वनशक्ती (NGO) |
| १६. | श्री.जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार | सिडको |
| १७. | श्री. दिपक धरवंदे | व.आरेखक | सिडको |
| १८. | SRO | SRO (व्ही.सी.व्दारे) | रत्नागिरी |
| १९. | श्री.अनिल वि. पंडित | प्रकल्प कार्यकारी | BOMBAY ENVIRONMENT ACTION GROUP |
| २०. | डॉ. रेश्मा पितले | शास्त्रज्ञ | BNHS, मुंबई |
| २१. | सौ.सरिता निलकंठ मुसके | सागरी सुरक्षा | सागरी शाखा, पालघर |
| २२. | श्री.उमेश पाटील | तहसिलदार, जिल्हाधिकारी, ठाणे | ठाणे जिल्हा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कार्यालय यांचे वतीने | |
| २३. | श्री.राजेश पवार | कार्यकारी अभियंता | पर्यावरण विभाग |
| २४. | डॉ.कैलास गायकवाड | उप-आयुक्त, परि.२ | नवी मुंबई, महानगरपालिका |
| २५. | श्री. प्रशांत मर्दे | सहाय्यक पोलिस आयुक्त | पोलीस उपआयुक्तालय (अभियान), मुंबई |
| २६. | श्री.अरुण नामवेद पवार | पोलिस निरीक्षक | सी.बी.डी. पो. ठाणे |
| २७. | श्री. पुंडलिक मिराशे | सल्लागार (पर्या.) | MIDC, अंधेरी |
| २८. | श्री. वैभव शेलार | सहा.वास्तुशास्त्रज्ञ, प्रा.का. | MIDC, महापे. |
| २९. | श्री.भारत शिवाजी ठेंबरे | पोलीस उप निरीक्षक | संरक्षण शाखा, ठाणे, शहर |
| ३०. | श्री.अजिंक्य पाटील | कक्ष अधिकारी, पर्या | नमुंमुपा |
| ३१. | श्री. विजय कातुर्डे | कार्या.सहाय्यक, पर्या व वने | सिडको |
| ३२. | श्री.दिपक धरवंदे | व.आरेखक | सिडको |
| ३३. | श्री.अजय वानखेडे | उप नियोजनकार, (पर्या व वने) | सिडको |
| ३४. | श्री. प्रदिप तावरे | सहाय्यक अधिक्षक | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय |
| ३५. | श्री.गोविंद शिवाजी मगर | सहाय्यक अभियंता ( SRA, BMC) | SRA, BMC |
| ३६. | श्री. अभिजित भुजबळ | पोलीस निरीक्षक | सुरक्षा शाखा, रायगड |
| ३७. | श्री. आयाज युसूफ पटेल | पोलीस निरीक्षक | कळंबोली, पो.ठाणे, पनवेल विभाग |
| ३८. | उपविभागीय अधिकारी | वसई, (व्ही.सी.द्वारे) | वसई |
| ३९. | पनवेल महानगरपालिका | DMC (व्ही.सी.द्वारे) | पनवेल महानगरपालिका |
| ४०. | PCC Head Office | PCC, Head Office यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | PCC, Head Office |
| ४१. | श्रीमती. राधिका फ़डके | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४२. | श्री. अनिकेत मनोरकर | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४३. | श्री.रोशन राठोड | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४४. | श्री.श्रीपाद कुलकर्णी | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४५. | सोनम देशमुख | (व्ही.सी.द्वारे) | |
| ४६. | श्री.सत्यसेलवम | (व्ही.सी.द्वारे) | |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय</th><th>कार्यवाही</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील बैठकीच्या इतिवृत्ताचे अनुषंगाने चर्चा.</td><td>

• कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५१ व्या बैठकीच्या सुरुवातीस समितीचे मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण मा.डॉ.राजेश देशमुख, भा.प्र.से. यांचे स्वागत डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, सदस्य सचिव यांनी केले.. त्यानंतर, या समितीच्या बैठकीस उपस्थितीत सर्व जिल्हाधिकारी, संचालक, पर्यावरण विभाग, उपविभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सर्व महानगरपालिकेचे प्रतिनिधी, वरिष्ठ नियोजनकार, सिडको, पोलिस निरीक्षक तसेच, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांचे प्रतिनिधी व व्हि.सी.व्दारे उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी या सर्वांचे स्वागत केले.

• दि. २८ ऑक्टोंबर, २०२४ रोजी झालेल्या कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५० व्या बैठकीमध्ये मा.अध्यक्ष यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याबाबत, समितीचे सदस्य सचिव यांनी, समितीकडे एकूण २० तक्रारी प्राप्त असून त्या तक्रारींबाबतचे वरील दिलेल्या सूचनेनुसार अहवाल अप्राप्त असल्याचे बैठकीत सांगितले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हा</th><th>तक्रारी संख्या</th></tr>
<tr><td>१.</td><td>मुंबई, शहर</td><td>२</td></tr>
<tr><td>२.</td><td>मुंबई, उपनगर</td><td>२</td></tr>
<tr><td>३.</td><td>रायगड</td><td>२</td></tr>
<tr><td>४.</td><td>ठाणे</td><td>५</td></tr>
<tr><td>५.</td><td>पालघर</td><td>८</td></tr>
<tr><td>६.</td><td>सिंधुदूर्ग</td><td>१</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>२०</td></tr>
</table>

• मा.अध्यक्ष यांनी पाणथळ तक्रारींचा जिल्हानिहाय आढावा घेताना समितीचे सदस्य सचिव यांनी मुंबई, शहर, मुंबई, उपनगर, रायगड यांच्याकडील प्राप्त तक्रारींचे विहित नकाशे तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अप्राप्त असल्याचे सांगितले. त्याबाबत, बैठकीत उपस्थित मुंबई, शहर व मुंबई, उपनगर यांच्या प्रतिनिधींनी त्याबाबतचा अहवाल समितीस लवकरच सादर करू असे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी बैठकीत / व्हि.सी.व्दारे उपस्थितीत तक्रारी संबंधित प्रतिनिधी यांना एक महिन्याच्या आत अहवाल सादर करणेबाबत सूचना दिल्या. त्याचप्रमाणे, रायगड, जिल्ह्यातील एका तक्रारीबाबत सिडको संदर्भातील अहवालावर आढावा घेत असताना बैठकीत उपस्थित सिडको यांचे प्रतिनिधी यांनी पाम बीच रोड लगत असलेल्या पॉकेट A ते E सेक्टर-६० नेरुळ, नवी मुंबई जमिनींबाबत सिडकोव्दारे वेळोवेळी करण्यात आलेल्या संयुक्त स्थळ पाहणीनुसार विषयांकित जागेवर कोंणतेही बांधकाम अथवा सदर जागेचा -हांस झाले नसल्याचे आढळून आले. तसेच, सदर प्रकरण हे मा.सर्वाच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून तशाच प्रकारचे अभिप्राय शासनाने नवी मुंबई परिसरातील पाणथळ क्षेत्राशी संबंधित तक्रारींच्या

</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | अनुषंगाने समिती गठीत केलेल्या समितीच्या अहवालामध्ये देखील नमूद केलेले आहे. असे सांगितले.<br>• तसेच, मा.अध्यक्ष यांनी ठाणे, जिल्ह्यातील तक्रारींच्या आढावा दरम्यान संबंधित यंत्रणांनी कार्यवाहीचा अहवालात "अतिक्रमण झाले किंवा कसे? झाले असल्यास काय कार्यवाही करण्यात आली? कोणत्या कायदा अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला? Restoration संदर्भात पुढे काय कारवाई करण्यात आली याबाबत स्वयंस्पष्टपणे नमूद करण्याचे अपेक्षित आहे असे सांगितले.<br>• त्याचप्रमाणे, पालघर जिल्ह्यातील तक्रारींवर आढावा घेताना व्हि.सी.व्दारे बैठकीत उपस्थितीत पालघरचे, प्रतिनिधी यांनी पालघर जिल्ह्यातील ७ तक्रारीपैकी ६ तक्रारींबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, वसई यांच्या स्तरावर प्रलंबित असून त्याबाबतचा अहवाल आठ दिवसात समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले तसेच, प्रत्यक्ष जे पाणथळ क्षेत्र आहे त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार संलग्न नाही पण प्राप्त तक्रारी ह्या पाणथळ म्हणून करण्यात आले असल्याचे सांगितले व तक्रारीत देखील कोणतेही स्थळ Wetland Brief Document मध्ये समाविष्ट नसल्याचे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रारी या जुन्या असून यावर कारवाई होणे अपेक्षित असल्याचे सांगितले व त्याबाबचा विहित नकाशे तपासून अहवाल त्वरीत सादर करणेबाबत सूचना दिल्या.<br>• तसेच, मा.अध्यक्ष यांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील प्राप्त तक्रारीवर व्हि.सी.व्दारे बैठकीत उपस्थित प्रतिनिधी यांना त्वरीत कारवाई करणेबाबत निर्देश दिले.<br>• दरम्यान व्हि.सी.व्दारे बैठकीत उपस्थित अशासकीय सदस्य, श्री.स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती यांनी देश पातळीवर ISRO या संस्थेने Wetland Atlas (NWIA, May, 2010) प्रकाशित केला असून यामध्ये समाविष्ट केलेल्या Wetland Atlas मधील कोकण विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये असणारे पाणथळ क्षेत्र (Wetlands) यांचे संरक्षण करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ही समिती गठीत करण्यात आली असल्याचे सांगितले तसेच, या समितीव्दारे कोकण विभागातील CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून तहसिलदार, इतर महसूल अधिकारी, तालुका स्तरीय पोलीस अधिकारी यांना पाणथळ क्षेत्राचे संरक्षण, संवर्धन व पुर्नस्थापना करणेसाठी उचित कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याचे देखील सांगितले.<br>• मा.अध्यक्ष यांनी वरीलबाबत व्हि.सी.व्दारे उपस्थित डॉ. अभय पिंपरकर, संचालक, पर्यावरण विभाग यांना विचारणा केली त्यांनी याबाबत, Wetland Brief Doucment सर्व जिल्ह्यांनी पाठविलेले होते व ते Wetland Authority समोर ठेवण्यात आले. सदरहू Wetland Brief Document Wetland Rules प्रमाणे बनविण्यात आले नसल्याने मागिल तीन व चार वर्षापासून पाठपुरावा सुरु असल्याचे सांगितले व त्यामुळे, सदर काम केंद्र शासनाच्या पर्यावरण खात्याकडील संस्थेला दिले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच, मा.सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसारच आजरोजी Wetland Atlas नकाशे तपासून तक्रारींवर कारवाई होणे अपेक्षित असल्याचे देखील बैठकीत सांगतिले.<br>• त्याप्रमाणे, मा.अध्यक्ष यांनी पालघर जिल्ह्यातील उपस्थित प्रतिनिधींना याबाबतची नोंद घेण्याबाबत सांगितले व संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, .MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या. |

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| २ | मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना | • मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाने संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत सूचना दिल्या.<br>• मा.अध्यक्ष यांनी पाणथळ ठिकाणचे डेब्रिज शास्त्रीयरित्या उचलण्याबाबत महानगरपालिका व इतर स्वायत्त यंत्रणांनी सदर निधीसाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या शासन स्तरावरील मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे सादर करावे लागणार आहे. त्यामुळे, पाणथळचे पुर्नस्थापन (Restoration) करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने अंदाजपत्रके तयार करुन त्याकरिता आवश्यक निधीसह (Associated Cost) जिल्हाधिकाऱ्यांनी / महानगरपालिका व इतर स्वायत्त संस्थांनी सर्व बाबी समाविष्ट करुन अंदाजपत्रके समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च सूचना दिल्या. |

(डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

(डॉ. राजेश देशमुख, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग